


चाळीतल्या छोट्याशा घरातही
दादांचं मिश्किल हसू कायम



अलबेलाचा अलबेला अभिनेता
मास्टर भगवान

अलबेला विनोदवीर मास्टर भगवान

नुकतंच गेल्या जमान्यातील गाजलेले विनोदी अभिनेते मास्टर भगवान यांचं देहावसान झालं. त्यांच्या आयुष्यात अनेक उतार-चढाव आले. पण या अडचणींनी भगवानदादा डगमगले नाहीत. [illegible] चेहऱ्यावरचं मिश्किल हसू तसंच होतं. [illegible] श्वासापर्यंत.

□ अजित [illegible]



भगवानदादांच्या याच नृत्याची
रसिकांना भुरळ पडली.



भगवान, नादिरा, शकीलाबानू भोपाली: गुजरा हुआ जमाना...

एखाद्या व्यावसायिक मसाला चित्रपटाला साजेशी मास्टर भगवान यांची जीवनगाथा होती. दादरच्या कोहिनूर मिलमधल्या एका कामगाराचा हा मुलगा चार इयत्ता शिकला. नशिबाला कर्तृत्वाची जोड लाभली आणि चित्रपटाचा नायक झाला. दारासमोर सहा-सहा विलायती गाड्या उभ्या राहू लागल्या. नशिबाचा डाव उलटा पडला आणि घरादारावर नांगर फिरला. कित्येक चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडाधड आपटले आणि अमिताभच्या चित्रपटात एक्स्ट्रा म्हणून काम करायची वेळ आली. करोडपतीचे पुन्हा रोडपती झाले. आजच्या पिढीला मास्टर भगवान हे नावही माहीत नसेल. पण कदाचित मागच्या पिढीलाही माहीत नसेल की सुपरस्टार अमिताभ बच्चन आणि दिलीपकुमार भगवानदादांच्या स्टाईलने नृत्य करायचे. असं त्या दोघांनीही आपल्या मुलाखतींतूनही कबूल केलंय.

खरोखरच भगवानच्या जीवनात अनेक चढ-उतार आले. १९१३च्या एक ऑगस्टला मुंबईच्या गिरणी भागात आबाजी पालव नावाच्या एका गिरणी कामगाराच्या घरी भगवानचा जन्म झाला. म्हणजे नुकतेच निवर्तलेले दादामुनी अशोककुमार यांच्याइतकेच भगवानदादाही सिनियर होते. जवळपास ८८-८९ वर्षांचे. विनोदवीर मेहमूदच्या शब्दात सांगायचं तर दिलदार स्वभावाचा माणूस चाळीतून बंगल्यात गेले आणि बंगल्यातून पुन्हा ४००-५००रु. रोजीवर काम करणारे एक्स्ट्रा बनले. परंतु भगवानच्या चेहऱ्यावरचं मिश्किल हसू आणि चमक कधीच कमी झाली नाही. ते जन्मजात अभिनेता होते.

अगदी दोन वर्षांपूर्वीचीच गोष्ट. २०००साली भगवानना राज कपूर पुरस्कार देण्यात आला. त्यावेळी 'जी'चे प्रतिनिधी त्यांना भेटायला दादर येथील त्यांच्या निवासस्थानी गेले असता डोळे मिचकावून दादा म्हणाले, 'क्या जमाना आया है, मेरे बाद में हिरो बने हुए मेरे ज्युनियर राज कपूर के नाम का ॲवॉर्ड दे रहे हो, मेरे को...' नंतर लगेच पुस्ती जोडली, 'गलत पहमी नही करना, ये तो मजाक कर रहा हूं. राज तो मेरा अच्छा दोस्त था. मेरी हर फिल्म के ट्रायल शो में और एडिटिंग में हाजिर रहता था.'

खरंय त्यांचं. एके काळी राज कपूर भगवानचा चाहता होता. रोजच्या धावपळीतून, टेन्शन्समधून बाहेर येण्यासाठी माणसं चित्रपट बघतात. म्हणूनच चित्रपट हलके फुलके आणि मनोरंजनपर असावेत ही भगवानदादांची फिलॉसॉफी राज कपूरनेही अंगीकारली. तुम्हाला कदाचित माहीत नसेल, भगवानचा सुपरडुपर हिट *अलबेला* ('भोली सूरत दिल के खोटे... 'फेम) आणि राज कपूरचा *आवारा* दोन्ही एकाच वेळी प्रदर्शित झाले. त्यावेळी राज कपूरच्या मनावर मोठं दडपण आलं होतं. चित्रपटात हलकंफुलकं मजेशीर संगीत असावं हे भगवानचं मतही राज कपूरला शंभर टक्के मान्य होतं. *आवारा* आणि *अलबेला* दोन्ही चित्रपटांनी रौप्य महोत्सव साजरे केले.

भगवानला पुढे शिकायचं होतं. प्राथमिक शाळेत त्यांनी पहिला नंबर कधीच सोडला नाही. चौथी पास झाल्यावर त्यांनी भीत भीत आपल्या वडिलांना सांगितलं, 'मला पुढे शिकायचं आहे.' आबाजी संतापले. ते म्हणाले, 'आपल्या सात पिढ्यांत कोणी शिकलं नाही इतकं तुला शिकवलं. (ही गोष्ट १९२०-२१च्या काळातली आहे.) आणि अजून तुला शिकायचंय. मला सांग तुला कामापुरतं लिहिता-वाचता येतं ना? मग पुढे शिकून काय बॅरिस्टर व्हायचंय? त्यापेक्षा आखाड्यात जाऊन जोर-बैठका मार.'

मुलाचा चेहरा पडला. तेव्हा आबाजी समजावणीच्या सुरात म्हणाले, 'हे बघ, आपण गरीब माणसं. गिरणी कामगार. साहेबासारखा शिकायला आपल्याकडे पैसा आहे कुठे? त्यापेक्षा असं काही कर की तुला नाव आणि पैसा मिळेल.'

भगवानने तेच केलं १९३०मध्ये मूकपटाच्या काळात कॉमेडियन म्हणून मास्टर भगवानचा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला- *बेवफा आशिक*. ते आपल्या आई-वडिलांना चित्रपट बघायला घेऊन गेले. चित्रपट संपल्यावर ऑडियन्समधून कोणीतरी दादांना ओळखलं. मग काय, त्यांच्याशी हात मिळवायला चाहत्यांची एकच झुंबड उडाली. आबाजी एका बाजूला ढाकलले गेले. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. ते बायकोला म्हणाले, 'आपला मुलगा खरोखर मोठा माणूस झाला हे...!'

कॉमेडीकडे वळण्यामागे बरीच कारणं होती. एक कारण त्यांचा बुटका बांधा. व्यायाम करून शरीर कमावलेलं. पण त्याप्रमाणात उंची नव्हती. दुसरं कारण नूर महंमद चार्ली. मूकपटाच्या काळात ते नंबर वन कॉमेडियन होते. तेही लल्लूभाई मेन्शन म्हणजे दादांच्याच चाळीत राहणारे. रोज संध्याकाळी शूटिंगवरून परतले की भगवानला घेऊन ट्राममधून फेरफटका मारायला निघत. तो स्वस्ताईचा काळ होता. एका आण्यात दादर ते कुलाबा ट्रामने जाता येत असे. रस्त्यात नूर महंमद चार्ली भगवानला विनोदी किस्से ऐकवत, मजा करत. ते ऐकून ट्राममधले इतर सहप्रवासीही हसून बेजार होत. तेव्हा आपणही कॉमेडियन व्हायचं असं भगवानने

मनोमन ठरवलं.

दुर्दैवाने देशाची फाळणी झाली. जे कलाकार पाकिस्तानला निघून गेले त्यात नूर महंमद चार्लीही होते. मोठा स्टार बनलेल्या भगवानने तेव्हाही माणुसकी दाखवली. जिकडे-तिकडे जातीय दंगे उसळले होते. त्यावेळी मुस्लीम कलाकारांना आपल्या गाडीत घालून भगवानदादा स्टुडियोत घेऊन जात. ड्रायव्हरला घरी बसवून स्वतः गाडी चालवत. व्यायामाने कमावलेलं शरीर आणि जबरदस्त लोकप्रियता. त्यामुळे भगवानच्या लांबलचक गाडीत मुस्लीम कलाकार आहेत हे माहीत असूनही दगड भिरकावण्याची कोणाची किंमत होत नसे.

१९३० ते १९८० या कालावधीत भगवानदादांनी सुमारे चारशे चित्रपटांत काम केलं. स्वतः अनेक चित्रपट बनवले. काही चित्रपटांचं दिग्दर्शनही केलं. सुदैवाने सुरुवातीच्या दोन-तीन दशकांत त्यांच्या नशिबाचा तारा चढा होता. अभिनय, नृत्य, संगीत, स्टंट, दिग्दर्शन या सगळ्यात भगवानदादा माहीर होते. आपल्या वेगळ्या नृत्यशैलीबद्दल एकदा 'जी'शी बोलताना त्यांनी सांगितलं की 'तुमच्या अविनाशभाईंनी (अविनाश व्यास) गुजरातला गातं केलं असेल तर मी चित्रपट कलाकारांना नाचतं केलंय.

अशोककुमार, मास्टर विठ्ठल, पृथ्वीराज कपूर, सोहराब मोदी यांचा तो काळ होता. अभिनेते हाणामारी करत, पण नृत्य नाही. त्यात त्यांना कमीपणा वाटे. त्यावेळी मी एक ट्रीक केली. कथ्थकचं फुटवर्क आणि वेस्टर्न डान्समधील कंबर लचकवणं यांची सांगड घातली. त्यातून माझा 'भोली सूरत दिल के खोटे...' ची स्टाईल जन्माला आली.'

खरंय. भगवाननी स्वतःची नृत्यशैली विकसित केली जी पुढे राज कपूर (रमैया वता वैया..., होठों पे सच्चाई रहती है...), दिलीपकुमार (*गंगा जमना* चित्रपटांची गीतं), राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आणि गोविंदासह अनेकजण त्यांच्या शैलीचं आजतागायत अनुकरण करत आले आहेत. आणि गमतीची गोष्ट अशी की अमिताभच्या अनेक चित्रपटांत नृत्य दिग्दर्शन करणारे पी. एल. राज भगवानच्या टीममध्ये शिकलेले होते. दादांच्या नृत्यशैलीचा त्यांनी मनापासून अभ्यास केला होता.

विनोद आणि संगीत या दोन कलांत दादांची शक्ती कमालीची होती. बोलता बोलता ते म्हणाले, 'आजकाल चित्रपट ५० दिवस चालला तर निर्माता-दिग्दर्शक पार्ट्या आयोजित करतात. पण मला हिट कॉमेडियन ठरवलेल्या *बेवफा आशिक* हा चित्रपट किती दिवस चित्रपटगृहात चालला माहितेय? फक्त चार दिवस! तरीही त्याची गणना हिट चित्रपटांत झाली.'

आणखी एक उदाहरण असंच गमतीशीर आहे. चेम्बूरला आर.के. स्टुडियोच्या शेजारीच दादांचा स्टुडियो होता. दोघं वेळ मिळेल तेव्हा गप्पा मारत. एक दिवस असेच बसलेले असताना त्या ठिकाणी बलराज साहनी आले. दादांना म्हणाले, 'आज तुझा चित्रपट पाहून आलो. दोन दिवसांपूर्वी माझी बायको मैत्रिणीबरोबर बघून आली आणि रात्रभर दोघी धूम हसत होत्या. म्हणून मीही बघितला.'

थँक्यू बलराज...

मध्ये मध्ये बोलू नका. मला माझं बोलणं पूर्ण करू द्या. तर तुमचा *भागम्भाग* मी तीन वेळा पाहूनही मला त्याची स्टोरीच नेमकी कळली नाही.

यावर भगवानदादांची हसून मुरकुंडी वळली. ते बलराज साहनीला म्हणाले, 'चित्रपटाचं नाव काय?'

भागम्भाग.

*भागम्भाग*चा अर्थ काय?

'इकडून तिकडे पळणं.' वैतागत साहनी बोलले.

अरे मग पळायचं. त्यात स्टोरी कसली शोधतोस?

आणि खरोखरच त्या चित्रपटाला काहीही स्टोरी नव्हती. किशोरकुमार आणि भगवान यांच्या या चित्रपटात दोघंही एका जॅकेटच्या मागे पळापळ करतात. हा एक रहस्यमय चित्रपट होता. त्याला विनोदाची इतकी सुरेख झालर होती की दर्शक शेवटपर्यंत खुर्चीला खिळून राहात. त्यानंतर अशोककुमार आणि प्राणचा *व्हिक्टोरिया नंबर २०३* हा चित्रपट याचीच उपकथा आहे.

एका आठवणीशिवाय भगवानदादांची आठवण कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. त्यांनी सांगितल्याप्रमाणे *अलबेला*मध्ये समाजातल्या सर्व थरातील लोकांचं मनोरंजन करण्यावर त्यांनी भर दिला होता. आजही तो चित्रपट कुठेही लागला तरी चाहत्यांची गर्दी होते. *अलबेला*च्या गाण्यांनी लोकांना वेड लावलं होतं. त्या गीतांबद्दल बोलून आजचा हा लेख पूर्ण करू या.

खुद्द दादांच्या शब्दांत सांगायचं तर गुजरात्यांना आवडेल असं 'भोली सूरत दिल के खोटे...' उत्तर प्रदेशवासीयांना आवडणारं 'शाम ढले खिडकी तले तुम सिटी बजाना छोड दो...' तर ख्रिश्चनांना आवडणारं 'गोरे गोरे ओ बांके छोरे...' आणि 'शोला जो भडके दिल मेरा धडके...' ही गीतं तर संगीत रसिकांच्या



*हम से बढकर कौन*मध्ये मिथुन - रंजिताबरोबर तरुण मनाचे भगवानदादाही थिरकले.

ओठांवर रेंगाळणारं 'धीरे से आजा रे अखियन में...' हे गीत. या चित्रपटाची नायिका होती गीता बाली. भगवानची सर्जनशीलता पाहून ती इतकी प्रभावित झाली होती की आपले पती शम्मी कपूर यांच्याकडे दादांचं कौतुक करताना थकत नसे.

भोली सूरत गाणं लागलं की लोक थिएटरमध्ये नाणी फेकत. या गाण्यामागची एक आठवण आहे. नूर महंमद चार्ली पाकिस्तानात निघून गेल्यावर दादा रोज संध्याकाळी अण्णा ऊर्फ रामचंद्र चितळकरसह फिरायला जात. एकदा असेच गेले असताना हरिजनवासजवळून जात होते. तिथे कोणाचं तरी लग्न होतं. ढोलकीच्या तालावर रास-गरब्याचं



बालकलाकार डेझी इराणीबरोबर भगवानदादा

संगीत वाजत होतं. ते ऐकून दादा चितळकरांना म्हणाले, 'आपल्याला ठेका पाहिजे.'

दुसऱ्या दिवशी अण्णांनी आपल्या स्टुडियोत त्याच तालावर गीत बसवलं पण दादांच्या मनात ठसलेला ठेका काही त्यांच्या ढोलकीवादकाला जमला नाही. मग त्या लग्नातल्या ढोलकीवादकाचा शोध सुरू झाला. तो राहात होता माझगावला. दादा अण्णांना घेऊन तिथे पोहोचले आणि त्याला घेऊन आले. पण मोकळ्या वातावरणात वाद्य वाजवणारा तो मनस्वी कलाकार. स्टुडियोच्या बंदिस्त वातावरणात ढोलकीवर थाप जमेना. साऊंड रेकॉर्डिस्ट मीनू कात्रक चिडून दादांना म्हणाले, 'ए दादा इसको किधर से उठा लाया है, निकाल बहार कर इसको.'

भगवानने मीनूला समजावलं. ते म्हणाले मला तर हाच ढोलकीवाला पाहिजे. शेवटी त्या वादकाला बाहेर बसवलं. बाकीचे सगळे आत. अशाप्रकारे रेकॉर्डिंग झालं आणि गाणं सुपरहिट ठरलं. फिल्मी हीरोंना नाचत करणाऱ्या भगवानदादांच्या या एकाच गीताने ते अनेक दशकं रसिकांच्या स्मृतीत राहतील... ●

मुंबई फेस्टिव्हलचा सुरीला सोहळा

शास्त्रीय संगीतातील अनेक दिग्गज कलाकारांची मैफल एका वेळी ऐकणं ही शास्त्रीय संगीतप्रेमींसाठी एक अनोखी पर्वणीच असते. ही पर्वणी अलीकडेच मुंबईकरांनी अनुभवली 'मुंबई फेस्टिव्हल'च्या रूपाने. गोरेगावच्या 'प्रबोधन' या संस्थेने २५ आणि २६ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या या महोत्सवात अठ्ठ्याऐंशी वर्षांच्या गानतपस्विनी गंगूबाई हनगल, पंडित भीमसेन जोशी, नर्तक केलूचरण महापात्रा, पंडित राजन आणि साजन मित्रा, तबलावादक पंडित किशन महाराज, पंडित झाकिर हुसेन आणि संतुरवादक पंडित शिवकुमार शर्मा यांनी आपले आविष्कार सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं.



पंडित भीमसेन जोशी

पंडित भीमसेन जोशी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या फेस्टिव्हलच्या पहिल्या दिवशी किराणा घराण्याच्या वयोवृद्ध गंगूबाई हनगल यांनी 'तराणा' गाऊन प्रेक्षकांची मनं जिंकली. तर पंडित किशन महाराजांनी आयत्या वेळी रचलेले तिहाईचे तुकडे वाजवून वाहवा मिळवली. पंडित भीमसेन जोशींनी राग यमन कल्याण, 'लागली समाधी...' हे भजन सादर केलं. दुसऱ्या दिवशी बनारस घराण्याची चैनदार-रसिली शैली लाभलेल्या पंडित राजन आणि साजन मिश्रा यांनी गायकी पेश केली. तर ओडिसी शैलीतील तपोवृद्ध नर्तक केलूचरण महापात्रा यांनी अष्टपदीतून कृष्णाच्या विरहाने व्यथित झालेल्या राधेच्या उत्कट आविष्काराने प्रेक्षकांवर मोहिनी घातली. फेस्टिव्हलच्या शेवटी झालेली पंडित झाकिर हुसेन आणि पंडित शिवकुमार शर्मा यांची तबला-संतुरवादनाची जुगलबंदी तर संपूर्ण फेस्टिव्हलचा कळसाध्याय ठरली.

विशेष म्हणजे फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भारत सरकारने पंडित किशन महाराज आणि गंगूबाई हनगल यांना पद्मविभूषण तर झाकिर हुसेन यांना पद्मभूषणच्या किताबाने सन्मानित केलं. त्याचं औचित्य साधून 'प्रबोधन'ने प्रसिद्ध तबलावादक पंडित सुरेश तळवलकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. या हृद्य सोहळ्याला उत्तर देताना पंडित किशन महाराज म्हणाले, 'माझं नशीब म्हणूनच मी जिवंत असताना सरकारने पद्मविभूषण देऊन माझा गौरव केला. नाहीतर अनेक कलाकारांना मृत्यूनंतर सन्मान मिळालाय.' गंगूबाई हनगल यांनी मात्र, 'मी सरकारकडून कधीच पुरस्काराची अपेक्षा केली नव्हती. तरीही एकतीस वर्षांनी तो मला मिळाला याचा आनंद मोठा आहे', अशी कृतार्थ प्रतिक्रिया व्यक्त केली तर तबलानवाझ पंडित झाकिर हुसेन यांनी 'सरकारने मला हा किताब दिल्याबद्दल मी सरकारचे आभारच मानतो.' असे उद्गार काढले.

सरकारने दिलेला 'पद्मभूषण' नाकारून 'भारतरत्न'ची अचाट मागणी करणाऱ्या नर्तकी सितारादेवींच्या अहंकारी वर्तनाच्या पार्श्वभूमीवर पंडित किशन महाराज, गंगूबाई हनगल, पंडित झाकिर हुसेन यांचा नम्रपणा प्रेक्षकांची मनं जिंकून गेला.

□ समीर